


**पुणे :** नाईकनवरे डेव्हलपर्सच्या वतीने दांडेकर पुलाजवळील 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या सदनिकांचे वाटप शनिवारी करण्यात आले. यावेळी डॉ. नितीन करीर यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी आणि हेमंत नाईकनवरे आदी.

# खाजगी विकसकाने किमान एक 'एसआरए' प्रकल्प हाती घ्यावा

## डॉ. नितीन करीर : 'परिवर्तन' झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १ -** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही आज झोपडपट्टीमध्ये राहते. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर या नागरिकांनाही चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे आणि याचसाठी खाजगी विकासकांनी झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांकडे वळणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक खासगी विकसकाने किमान एक प्रकल्प हाती घ्यावा, असे मत नगरविकास प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी शनिवारी व्यक्त केले.

येथील नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन आणि ग्राहकांना १९२ सदनिका हस्तांतरणाचा कार्यक्रम डॉ. करीर यांच्या हस्ते झाला.

नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत आणि रणजीत नाईकनवरे, पालिका आयुक्त सौरभ राव, 'क्रेडाई नॅशनल'चे अध्यक्ष सतीश मगर, 'क्रेडाई महाराष्ट्र'चे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे सीईओ अशोक पाटील, सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, शरद महाजन, वास्तुविशारद संदीप महाजन, नगरसेवक धीरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे, सलीम पटेल, शिवाजी पारिटे आणि शाहीद पटेल आदी यावेळी उपस्थित होते.

नाईकनवरे डेव्हलपर्सच्या वतीने सध्या सातारा रस्ता, मंगळवार पेठ-जुना बाजार, रामटेकडी, विद्यापीठ रस्ता या ठिकाणी एसआरएचे प्रकल्प सुरू आहेत. दांडेकर पुलाजवळ 'परिवर्तन' आणि आणखी एक प्रकल्प उभारला जात असून, या दोन प्रकल्पांमध्ये एकूण ६ इमारती बांधल्या जात आहेत.

यावेळी प्रत्येक सभासदाशी स्वतंत्र करारनामा करण्यात आला असून, अभिहस्तांतरण प्रक्रिया पार पडली. हस्तांतरणापूर्वीच ही पूर्तता केलेला हा भारतातील एकमेव प्रकल्प ठरेल. त्यामुळे एसआरए क्षेत्रात एक नवा मापदंड प्रस्थापित होईल, असा विश्वास यावेळी हेमंत नाईकनवरे यांनी व्यक्त केला. तर, रणजीत नाईकनवरे यांनी आभार मानले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचलन केले.

### 'टीओपी' धोरणाबाबत लवकरच अध्यादेश

मेट्रोच्या 'ट्रान्सपोर्ट ओरिएन्टेड प्लान'ची शनिवारी बैठक झाली आहे. त्यामध्ये प्रीमियम ठरवला आहे. मात्र, अध्यादेशादेशाद्वारे तो जाहीर करण्यात येणार आहे. तसेच स्टेट अर्बन ट्रान्सपोर्ट मोबिलिटी प्लान आम्ही पुढच्या महिन्यात कॅबिनेटपुढे ठेवणार आहे. त्यामध्ये पादचारी त्यानंतर सायकलस्वार आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यांना समोर ठेवून बनवला आहे. तो मंजूर झाला की अंमलबजावणी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. करीर यांनी दिली.